शिक्षकांची नियुक्ती न झाल्यामुळे बेलगावच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात >>पान 2

तुपकरांच्या नेतृत्वात मलकापुरात शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा >>पान 3

आंदोलनाकडे इंग्रजासारखा पाहण्याचा दृष्टिकोन न ठेवता लोकशाहीच्या मार्गाने तोडगा काढण्याचा प्रयत्न करावा - बच्चू कडू >>पान 4

**सुविचार**

दुसऱ्यांच्या गरजांचा विचार करा.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 40 ■ रविवार, दि. 31 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



छोट्या बजेटमध्ये मोठा धमाका, मोहनलाल यांचा चालू वर्षातील मोठी ओपनिंग देणारा सिनेमा, कमाई किती? आतील पान

# मराठवाड्यातील मराठे कुणबी असल्याचे तत्वत: मान्य

## शिंदे समितीचा जरांगेंना शब्द; शिंदे समितीला चर्चेला पाठवणे हे साफ चूक : जरांगे

**मुंबई/प्रतिनिधी : आझाद मैदानात आंदोलनाला बसलेल्या मनोज जरांगे यांच्याशी चर्चा करण्यासाठी माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे दाखल झाले.माजी न्या. शिंदे यांनी कुणबी नोंदी किती सापडल्या यासंदर्भातील माहिती दिली. शिंदे समितीनं १३ महिने अभ्यास केला आता मराठवाड्यातील मराठा कुणबी असा अहवाल द्यावा, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली. २ लाख ३९ हजार प्रमाणपत्र मान्य केल्याची माहिती देखील न्या. शिंदे यांनी मनोज जरांगे यांना दिली.**



शिंदे समितीनं १३ महिने अभ्यास केला, आता मराठवाड्यातील मराठा कुणबी असा अहवाल द्या, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली. ५८ लाख नोंदी हा कुणबी आणि मराठा एकच असल्या पुरावा आहे. मराठा आणि कुणबी एकच असल्याचा जीआर काढावा, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली.

सरसकट मराठे कुणबी ठरत नाहीत तर ओबीसीत जात सरसकट कशी जाते,असा सवाल मनोज जरांगे यांनी केला. अर्धे मराठे कुणबी,अर्धे मराठे मराठा कसे, असा सवाल जरांगे यांनी केला. अर्धा पश्रि्चम महाराष्ट्र,अर्धा मराठवाडा कुणबी आहे. कोकणातले मराठे,पठार भाग मराठा आहे. तर खानदेश,विदर्भातले मराठा कुणबी आहे, असं मनोज जरांगे म्हणाले.

५८ लाख नोंदी मराठा आणि कुणबी एकच असल्याचा पुरावा आहे. मराठा आणि कुणबी एक असल्याचा जीआर काढावा, जीआर काढल्याशिवाय मी हटणार नाही, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं. मराठा-कुणबी एक असल्याचा जीआर काढायला मुदत देणार नाही, असंही मनोज जरांगेंनी सांगितलं. छत्रपती संभाजीनगरमध्ये १ लाख २३ हजार कुणबी होते ते कुठं गेले? असा सवाल मनोज जरांगे यांनी केला. बीड, जालना जिल्ह्यातील कुणबी कुठं गेले, असा सवाल मनोज जरांगेंनी केला.

**माजी न्या. शिंदे काय म्हणाले?**

आतापर्यंत मराठवाड्यात २ लाख ४७ हजार नोंदी मिळाल्या नोंदी मिळालेल्यांपैकी २ लाख ३९ हजारांना प्रमाणपत्रे दिले. संपूर्ण महाराष्ट्रात ५८ लाख नोंदी मिळाल्या. संपूर्ण महाराष्ट्रात १० लाख ३५ हजार प्रमाणपत्रे दिली आहेत. गॅझेटियर लागू करणार, पण कोणत्या संदर्भात ते अजून ठरायचं आहे. अभ्यास करुन गॅझेटियरचं कायद्यात रुपांतर करावं लागेल,गॅझेटियरसाठी सहा महिन्यांचा कालावधी लागेल, असं न्या. संदीप शिंदे म्हणाले.

जातीचा दाखला व्यक्तीला मिळेल,सरसकट समाजाला नाही, अशी माहिती देखील न्या. शिंदे यांनी दिली. सर्व मराठ्यांना कुणबी ठरवता येणार नाही. मराठवाड्यातले मराठे कुणबी हे तत्वतः मान्य असल्याचं न्या.शिंदे यांनी म्हटलं.

**मनोज जरांगे पाटील यांच्या नेमक्या मागण्या कोणत्या?**

१. मराठा कुणबी एक आहेत. याची अंमलबजावणी झाली पाहिजे,

२. हैदराबाद गॅझेटियर लागू करा...सातारा, बाँबे गॅझेटियर लागू करावे.

३. ज्याची कुणबी नोंद सापडली आहे त्याचे सगे सोयरे घ्या...सगे सोयरे पोट जात म्हणून घ्या.

४. मराठा आंदोलकांवरील सरसकट गुन्हे मागे घ्या.

५. आमचं कायद्यात बसणारे आरक्षण द्या.



## मराठा आंदोलकांच्या आक्रमक पवित्र्यानंतर बीएमसीला जाग, तातडीने १० सुविधा पुरवल्या

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुकारलेल्या उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे. शुक्रवारी मनोज जरांगे यांनी आझाद मैदानावर उपोषणास सुरुवात केली. या आंदोलनासाठी हजारो मराठा बांधव मुंबईत दाखल झाले आहेत. मात्र, उपोषणाच्या पहिल्याच दिवशी मुंबईतील पावसाने आंदोलनकर्त्यांची मोठी परीक्षा घेतली. आझाद मैदानावर चिखल, पिण्याच्या पाण्याची व शौचालयाची कमतरता यामुळे आंदोलकांना प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागला.

या परिस्थितीवर आंदोलकांचा रोष उसळला आणि शनिवारी सकाळपासून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) स्थानकाबाहेरील रस्त्यावर त्यांनी ठिय्या देत वाहतूक जवळपास चार तास रोखून धरली. त्यानंतर महापालिकेवर दबाव वाढला आणि आता बृहन्मुंबई महानगरपालिकेने आंदोलकांसाठी काही महत्त्वाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

महापालिकेकडून आझाद मैदानात करण्यात आलेल्या सोयी-सुविधांमध्ये सर्वप्रथम मैदानावर झालेला चिखल हटवून प्रवेशमार्ग समतल करण्यात आला आहे. यासाठी दोन ट्रक खडी टाकण्यात आली आहे. रात्रीच्या वेळी पुरेशी प्रकाशयोजना व्हावी यासाठी अग्निशमन दलाच्या मदतीने प्रखर झोताचे विद्युत दिवे उभारण्यात आले आहेत. आंदोलनकर्त्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून ११ टँकर्स मैदानात आणले आहेत आणि

अतिरिक्त टँकर्सही मागविण्यात आले आहेत. स्वच्छतेसाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करून सातत्याने साफसफाई केली जात आहे. आरोग्य सेवेसाठी मैदानात वैद्यकीय मदत कक्ष उभारण्यात आला असून, ४ वैद्यकीय पथके आणि २ रुग्णवाहिका २४ तास कार्यरत आहेत. शिवाय, '१०८' रुग्णवाहिका सेवा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

शौचालयाच्या समस्येवर महापालिकेने विशेष उपाययोजना केल्या आहेत. मैदानात २९ शौचकूप असलेले शौचालय विनामूल्य उपलब्ध आहे. याशिवाय महात्मा गांधी मार्गावर प्रत्येकी १० शौचकूप असलेली ३ फिरती शौचालये, मेट्रो साइट शेजारी १२ पोर्टेबल शौचालये, तसेच फॅशन स्ट्रीट परिसरात मिळून तब्बल २५० फिरती शौचकूपे उभारण्यात आली आहेत. मैदानाबाहेरील सार्वजनिक शौचालयेही आंदोलकांसाठी मोफत खुली करण्यात आली आहेत.

पिण्याच्या पाण्याचा पुरवठा देखील सुरू

पावसाळी परिस्थिती पाहता मैदान परिसरात कीटकनाशक फवारणीसाठी स्वतंत्र पथके नेमण्यात आली आहेत. शिवाय, स्थानिक अधिकाऱ्यांकडून सातत्याने पाहणी व देखरेख केली जात आहे. आवश्यक असल्यास इतर कार्यालयांमधून अतिरिक्त अधिकारी व कर्मचारी बोलावले जात आहेत. महत्त्वाचे म्हणजे, आझाद मैदान व परिसरातील उपाहारगृहे आणि खाद्यपदार्थांची दुकाने बंद करण्यात आलेली नाहीत. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा देखील सुरू असल्याचे महापालिकेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील हे उपोषण आता दुसऱ्या दिवशी पोहोचले असून, महापालिकेने उभारलेल्या सुविधांमुळे आंदोलकांना थोडा दिलासा मिळणार आहे. तथापि, मराठा समाजाच्या मागण्यांवर सरकार नेमका काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अजित पवार यांचे विधान - समन्वयाने प्रश्न सोडवण्यासाठी सरकारचे पूर्ण प्रयत्न सुरु



**पुणे/प्रतिनिधी:** मराठा आंदोलन आणि इतर राजकीय मुद्यांवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पत्रकार परिषदेत आपल्या प्रतिक्रिया दिल्या. यावेळी त्यांनी सरकारच्या प्रयत्नांची माहिती दिली आणि काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकला.

नगरसेवक बैठक:

अजित पवार यांनी पुणे महापालिकेतील नव्याने रचलेले प्रभाग आणि त्यावर आलेल्या तक्रारींची माहिती दिली. ''पिंपरी चिंचवडमध्ये काही प्रभागांची रचना बदलली नाही, पण पुण्यामध्ये थोडा बदल झाला आहे. तिन्ही पक्षाचे नेते एकत्र बसून वरिष्ठ स्तरावर निर्णय घेतील,'' असे पवार यांनी स्पष्ट केले. त्याच वेळी, त्यांनी स्वबळाचा नारा दिल्याचे नाकारले आणि निर्णय अंतर्गत चर्चेच्या आधारावर होईल, असे सांगितले.

मनोज जरांगे आंदोलन:

मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या मराठा आरक्षण आंदोलनावर पवार यांनी सरकारचे प्रयत्न स्पष्ट केले. ''समन्वयाने प्रश्न सोडवण्यासाठी सरकार पूर्ण प्रयत्न करत आहे. शिंदे समिती आज भेटली असून, राधाकृष्ण विखे पाटील आणि इतर ११ जणांची समिती यावर चर्चा करत आहे,'' असे त्यांनी सांगितले.

यशवंत कारखाना:

यशवंत कारखानाच्या खरेदीसंदर्भात पवार यांनी सांगितले की, ''हा कारखाना आता विक्रीसाठी तयार आहे. विभागांनी आवश्यक परवानग्या दिल्या आहेत. ही चर्चा शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने सुरू आहे,'' असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस यांचे एकाकीपण: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एकाकी पडले असल्याचे विशिष्ट आरोप फेटाळताना, पवार म्हणाले, ''कोणतीही अशी परिस्थिती नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि इतर नेत्यांची चर्चा सुरू आहे. आंदोलन करणाऱ्यांना संविधानिक अधिकार आहे, आणि त्या संदर्भात चर्चा सुरू आहे,'' असे ते म्हणाले.

# मराठा आरक्षणासाठी आ. सिद्धार्थ खरात यांची मनोज जरांगे पाटील यांच्याशी आझाद मैदानावर चर्चा

## समाजाच्या न्याय्य मागण्यांना ठाम समर्थन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा समाजाच्या न्याय्य आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनात एक महत्त्वपूर्ण घटना घडली. शिवसेना ठाकरे गटाचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि मेहकर-लोणार मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार सिद्धार्थ खरात यांनी आज मुंबईतील आझाद मैदानावर सुरू असलेल्या मराठा आरक्षण आंदोलनाला भेट दिली. या भेटीमध्ये आमदार खरात यांनी आंदोलनाच्या प्रमुख नेत्यांशी सविस्तर चर्चा केली आणि समाजाच्या न्याय्य मागण्यांना ठामपणे समर्थन दिले.

सिद्धार्थ खरात यांचा ठाम संदेश आमदार सिद्धार्थ खरात यांनी या आंदोलनाला पूर्ण समर्थन दर्शवित मराठा समाजाच्या हक्कांसाठी शासकीय पातळीवर लवकरात लवकर निर्णय घेण्याची मागणी केली. ''मराठा समाजाला शैक्षणिक, सामाजिक आणि रोजगाराच्या दृष्टीने न्याय मिळवण्यासाठी राज्य सरकारने तातडीने आणि ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे,'' असे ते म्हणाले.

तसेच, त्यांनी हेही स्पष्ट केले की प्रत्येक पिढीला समान संधी मिळणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. ''मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी जो संघर्ष सुरू झाला आहे, त्यामध्ये सशक्त आणि विधायक भूमिका घेऊन आम्ही समाजाच्या पाठीशी उभे राहणार आहोत,'' असे आमदार खरात यांनी व्यक्त केले.

मनोज दादा जरांगे पाटील यांची भेट सिद्धार्थ खरात यांनी यावेळी मराठा आरक्षण आंदोलनाचे प्रमुख नेते आणि समाजातील एक प्रेरणास्त्रोत, मा. मनोज दादा जरांगे पाटील यांची भेट घेतली. जरांगे पाटील यांचे

मराठा समाजाच्या आरक्षणाची मागणी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नाही, तर रोजगाराच्या संधींसाठी आणि सामाजिक न्यायासाठी देखील आहे. समाजातील आर्थिक पिछाडी, शैक्षणिक पातळीवर कमतरता आणि रोजगाराच्या संधी न मिळाल्यामुळे मराठा समाज आजही मागे पडलेला आहे. त्यामुळे मराठा समाजाला शासकीय आरक्षण मिळवणे, यासाठी हे आंदोलन जोमाने सुरू आहे.

आंदोलनाने संपूर्ण राज्यभर मेंदूला लागणारे आवाज दिले असून, त्यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाच्या आरक्षणासंबंधी बऱ्याच अडचणी दूर होण्याची आशा आहे. आंदोलनामुळे राज्यभरात निर्माण झालेली एकजूट मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सुरू असलेल्या या आंदोलनामुळे राज्यभरात एक नवीन जागृती निर्माण झाली आहे.





आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारने या मुद्द्याची गांभीर्याने दखल घेतली आहे आणि त्यावर लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. तथापि, आंदोलनकर्त्यांनी राज्य सरकारवर दबाव टाकला आहे की, त्यांच्या मागण्या मान्य होईपर्यंत हे आंदोलन सतत सुरु ठेवले जाईल.

समाजातील प्रत्येक स्तरावरून या आंदोलनाला समर्थन मिळत असून, सर्वपक्षीय नेत्यांचे आणि सामाजिक कार्यकर्त्यांचे समर्थन देखील वाढले आहे. या आंदोलनामुळे मराठा समाजाच्या आशा आणि अपेक्षांमध्ये वाढ झाली आहे, आणि यासाठी त्यांना एकत्र उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

आंदोलनाच्या परिणामस्वरूप, आगामी काळात राज्य सरकारने या मुद्द्यावर ठोस आणि त्वरित निर्णय घेण्याची आवश्यकता आहे, अशी सर्वसामान्यांची भावना आहे.

मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या या आंदोलनामुळे राज्यभरात एक नवीन सामाजिक जागृती निर्माण झाली आहे. आमदार सिद्धार्थ खरात यांच्या भेटीने आंदोलनाला एका नवे उचंकी मिळाली आहे. हे आंदोलन केवळ मराठा समाजासाठी नाही, तर संपूर्ण राज्यातील सामाजिक न्याय आणि समान संधी मिळवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरू शकते.

## भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व ; प्रणव मुखर्जी

भारताचे माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचा आज स्मृतिदिन. पाच वर्षापूर्वी ३१ ऑगस्ट २020 रोजी त्यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला होता कारण प्रणव मुखर्जी हे भारतीय राजकारणातील एक ऋषितल्य व्यक्तिमत्व होते. प्रणव मुखर्जी हे भारतीय राजकारणातील एकमेव असे व्यक्ती होते की ज्यांच्याविषयी सर्वसामान्य नागरिकांपासून ते पंतप्रधानांपर्यंत आणि सत्ताधारी पक्षांपासून विरोधी पक्षांपर्यंत सर्वांनाच कमालीचा आदर होता. भारतीय राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले प्रणव मुखर्जी यांना भारतीय राजकारणातील भीष्म पितामह म्हणावे लागेल कारण जवळपास पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी भारतीय राजकारणात घालवले. त्याचा जन्म ११ डिसेंबर १९३५ चा. त्यांचे वडील स्वातंत्र्य सेनानी होते. त्यांनी इंग्रजांविरुद्ध लढा दिला. त्यासाठी त्यांनी दहा वर्ष कारावासही भोगला. प्रणव मुखर्जी यांचे वडील काँग्रेस कमिटीचे सदस्य होते तसेच पश्चिम बंगाल विधानपरिषदेचे अध्यक्ष होते त्यामुळे लहानपणीच त्यांच्यावर देशभक्तीचे संस्कार झाले. प्रणव मुखर्जी यांनी कोलकाता येथील विद्यासागर विद्यापीठातून एम ए आणि एल एल बी केले. राजकारणात येण्याआधी त्यांनी काहीकाळ प्राध्यापक म्हणून नोकरी केली तर काहीकाळ पत्रकारिताही केली. पण लहानपणीच राजकारणाचे बाळकडू मिळाल्याने त्यांनी १९६९ साली राजकारणात प्रवेश केला आणि अल्पावधीतच आपल्या वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्वाच्या जोरावर मंत्रिपदापर्यंत मजल मारली. आपल्या तल्लख बुद्धीने आणि दूरदृष्टीने त्यांनी त्या पदावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. नियोजन आयोगाचे अध्यक्ष, राज्यसभेचे आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते, गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री तसेच विविध संसदीय समित्यांची अध्यक्षपदे अशी अनेक महत्त्वाची पदे त्यांनी भूषवली. या सर्व पदांवर त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. प्रणव मुखर्जी हे त्यांच्या विविध लोकाभिमुख निर्णयाने देशभर चर्चेत राहिले. राष्ट्रपतीपद ग्रहण करण्यापूर्वीपासूनच संसदीय लोकप्रणालीत अद्ययावत माहिती ठेवणारे नेते म्हणून प्रणव मुखर्जी यांची ख्याती होती. लोकसभेत विविध पदे भूषवताना संसदेच्या आवारात अगदी विरोधी पक्षातील दिग्गज नेतेही त्यांच्याशी महत्वाच्या प्रश्नांवर चर्चा करताना आढळत. नव्या खासदारांसाठी त्यांचे भाषण, संसदीय आयुधे वापरून प्रश्न उपस्थित करणे हे प्रशिक्षणच होते. गृह, अर्थ, संरक्षण आणि परराष्ट्र धोरण याबाबतचे त्यांचे ज्ञान चकित करणारे होते त्यामुळेच त्यांना भारतीय राजकारणात व ज्ञानी वर्तुळात संसदीय प्रणालीची एक चालती बोलती लायब्ररी संबोधले जायचे म्हणूनच राष्ट्रपतीपदी त्यांची निवड झाल्यावर एका योग्य नेत्याची निवड झाली अशीच भावना संपूर्ण देशाची झाली होती. राष्ट्रपतीपद हे घटनेतील सर्वोच्चपद आहे. या पदाला एक मान आहे, प्रतिष्ठा आहे. एक वेगळा शिष्टाचार असलेले हे पद आहे. राष्ट्रपतीपदी निवड झाल्यानंतर त्यांनी या पदाची प्रतिष्ठा वाढवण्याचेच काम केले. प्रणव मुखर्जी यांनी राष्ट्रपती पदाच्या पूर्वी लावले जाणारे महामहीम हा शब्द न वापरण्याची प्रशासनाला सूचना केली. हे पद आणि त्याची समावेशकता वाढवण्याचा हा महत्वाचा निर्णय होता. भारतीय लोकशाहीचा इतिहास जगाला सांगणारा, जगाची भाषा समजणारा एक ऋषितुल्य वक्ता याठिकाणी विराजमान असल्याचे समाधान देशाला मिळाले. ३१ ऑगस्ट २०२० रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने देशाची कधीही भरून न निघणारी हानी झाली. त्याच्या निधनाने भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व हरपले. भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व असलेले माजी राष्ट्रपती स्वर्गीय प्रणव मुखर्जी यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !

# शिक्षकांची नियुक्ती न झाल्यामुळे बेलगावच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात

## बेलगाव जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची कमतरता; पालकांनी भरवली शाळा

दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव** : बेलगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये सहावी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांची कमतरता निर्माण झाली आहे. यामुळे संतापलेल्या पालकांनी शाळा भरवण्याचा निर्णय घेतला आहे. पालकांनी ३० ऑगस्ट २०२५ पासून शाळा बंद ठेवण्याचा ठराव घेतला असून, १ सप्टेंबरपासून एकही विद्यार्थी शाळेत पाठवणार नाही, असा निर्णय घेतला आहे.

या प्रकरणाची सुरूवात झाली १४ ऑगस्ट २०२५ रोजी, जेव्हा पालकांनी शाळेतील शिक्षकांची कमतरता दूर करण्यासाठी लेखी निवेदन दिले. त्यानंतर २१ ऑगस्ट २०२५ रोजी शाळेतील शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी पालकांना आश्वासन दिले की, शिक्षकांची नियुक्ती लवकरच केली जाईल. तथापि, अद्याप शिक्षिका नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही.

यामुळे पालकांच्या संतापात वाढ झाली आणि त्यांनी शाळेच्या प्रशासनावर दबाव आणण्यासाठी ३० ऑगस्ट पासून शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. पालकांचा आरोप आहे की, शिक्षण विभागाने त्यांना केवळ उडवाउड उत्तर दिले आणि शाळेतील विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर कोणत्याही प्रकारे लक्ष दिले नाही.



### उपायाची आवश्यकता

पालकांनी यावेळी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांची नियुक्ती त्वरित केली जावी अशी मागणी केली आहे. ते म्हणतात की, ''शाळेतील शिक्षकांची कमतरता लवकरात लवकर भरून काढली जावी, अन्यथा ४ सप्टेंबर २०२५ पासून शाळा भरण्यासाठी आम्ही बंधनकारक ठराव करणार आहोत.

### पालकांचा संताप वाढला

दोन आठवड्यांपूर्वी दिलेल्या आश्वासनानुसार शिक्षण विभागाने शिक्षकांची नियुक्ती केली नाही, त्यामुळे पालकांचा संताप वाढला आहे. शिक्षण विभागाने यावर तात्काळ कार्यवाही केली पाहिजे, अन्यथा पालकांच्या पुढील कारवाईमुळे शाळेची स्थिती अधिक गंभीर होईल.

पालकांचे म्हणणे आहे की, शिक्षण विभागाने २१ तारखेस दिलेल्या लेखी आश्वासनानुसार शिक्षकांची नियुक्ती करणे आवश्यक होते, पण ते पूर्ण झालेले नाही. पालकांनी ४ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांची सभा आयोजित केली आहे, ज्यामध्ये गट शिक्षण अधिकारी मेहकर यांच्या कार्यालयात शाळा भरवण्याची योजना आहे.

याबाबत पालकांनी संबंधित विभागांना गंभीर दखल घेण्याचे निवेदन दिले आहे. त्याचबरोबर, शिक्षिका नियुक्तीच्या संदर्भातील प्रतिनियुक्ती आदेशावर सखोल चौकशीची मागणी केली आहे. यामध्ये एक शंका व्यक्त केली आहे की, एक अतिरिक्त शिक्षक म्हणून नियुक्त केलेली शिक्षिका कोणाच्या शिफारशीवर किंवा सूचनेवर नियुक्त करण्यात आली का? याबाबत योग्य चौकशी केली जावी.

शाळेतील शिक्षकांची नियुक्ती न झाल्यामुळे पालकांचा संताप वाढला आहे आणि ते शिक्षण विभागाच्या प्रशासनावर दबाव आणत आहेत. पालकांचा कडवट आरोप आहे की, या विषयावर शिक्षण विभाग गांभीर्याने दखल घेत नाही आणि शाळेच्या विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आणले आहे.

### विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीला जबाबदार कोण?

पालक आणि शिक्षण विभागातील अक्षम संवादामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीला मुख्यत: शिक्षण विभाग आणि शाळेचे प्रशासन जबाबदार आहे. शिक्षकांची कमतरता आणि त्यावर बारकाईने कार्यवाही न केल्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य शैक्षणिक मार्गदर्शन मिळत नाही. विशेषत: सहावी आणि सातवीतील विद्यार्थ्यांच्या शालेय अभ्यासक्रमावर याचा प्रतिकूल परिणाम झाला आहे. यासोबतच, पालकांच्या उपोषण आणि शाळा बंद ठेवण्याच्या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास थांबलेला आहे. प्रशासनाकडून वेळेवर शिक्षकांची नियुक्ती न करणे, वचनांची पूर्तता न करणे आणि एकाच समस्येवर अनेक वेळा आश्वासन देणे ही परिस्थिती आणखी कठीण बनवते. त्यामुळे, शैक्षणिक नुकसानीसाठी मुख्यत: शिक्षण विभागाचीच जिम्मेदारी ठरते.

# ईद-ए-मिलाद व गणेश विसर्जनाच्या दिवशी मद्य विक्रीवर बंदी

## जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश ; उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई होणार

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यात आगामी ईद-ए-मिलाद, अनंत चतुर्दशी व गणेश विसर्जन या दिवशी कोरडा दिवस अर्थात मद्य विक्री बंदीचा आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जारी केला आहे. महाराष्ट्र दारुबंदी कायद्याअंतर्गत जारी आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व देशी व विदेशी मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांची दुकाने बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

यानुषंगाने जिल्ह्यातील एफएल-२, एफएल-३, एफएल-४, एफएल/बीआर-२ व सीएल-३ अनुज्ञप्तीधारकांना आपली दुकाने व मद्य विक्री केंद्रे संबंधित दिवशी बंद ठेवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकाविरुद्ध कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

या दिवशी राहणार कोरडा दिवस

५ सप्टेंबर २०२५ (शुक्रवार): ईद-ए-मिलाद निमित्त संपूर्ण दिवस दारूबंदी.

६ सप्टेंबर २०२५ (शनिवार): अनंत चर्तुदशीच्या दिवशी कायद्यानुसार दारूबंदी लागू.

७ व ८ सप्टेंबर २०२५: ज्या दिवशी व ठिकाणी गणेश विसर्जन होईल, त्या ठिकाणी विसर्जन सोहळा पूर्ण होईपर्यंत दारूबंदी राहणार आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना या आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रत्येक उत्सव काळात अवैध मद्य निर्मिती, वाहतूक व विक्रीवर देखील बारीक लक्ष ठेवावे, असे आदेशात नमूद केले आहे. याव्यतिरिक्त, संबंधित कार्यक्षेत्रात काही अनुचित घटना घडल्यास त्याबाबत संबंधित दुय्यम निरीक्षकांना थेट जबाबदार धरले जाईल, असा इशारा देखील अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांनी दिला आहे.

## गणेशोत्सवात पावसाचा धुमाकुळ, पुढील २ दिवस जोर ओसरणार; हळूहळू पुन्हा वाढणार

मुंबई : ऑगस्टच्या मध्यावर पावसाने संपूर्ण महाराष्ट्रात जोरदार हजेरी लावल्यानंतर ऐन गणेशोत्सवात पावसाने धुमाकूळ घातला. विदर्भ मराठवाड्यात मुसळधार पावसाची हजेरी लागली. नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक पावसाची नोंद झाली असून मन्याड नदीला पूर आला .लिंबोटी धरण पूर्ण क्षमतेने भरलं. शेत जमीन पाण्याखाली गेली. अनेक गावांचा संपर्क तुटला. दरम्यान पुढील चार दिवस पावसाचा जोर ओसरणार असल्याचं हवामान विभागाने सांगितलंय. दरम्यान आज संपूर्ण कोकण किनारपट्टीवर पावसाचा येलो अलर्ट देण्यात आलाय .नाशिक ,धुळे, नंदुरबार, जळगावसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी जिल्हातही पावसाचा इशारा देण्यात आलाय.

# शाहिरांचा विचार जपला तरच इतिहास जिवंत राहील: प्रवीण गीते

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** या देशांमध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी बरोबरच अनेक चळवळींचे स्पुल्लिंग पेटवण्याचे काम इथल्या शाहीर,कवी,गायक यांनी केले आहे. सामान्य माणसांच्या धमन्यांमधील रक्त तापवण्याचे काम शाहीरानी केले आहे.आणि त्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळीपासून तर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपर्यंत व अनेक शेतकरी चळवळी उभ्या करण्याचे काम शाहीरांच्या माध्यमातून झाले असल्याने, शाहिरांचा विचार जिवंत ठेवण्याचे काम जर आम्ही करू शकलो तरच इथला इतिहास जिवंत राहणार आहे असे मौलिक उद्गार लोकजागर परिवाराचे सर्वेसर्वा प्रवीण गीते यांनी याप्रसंगी काढले.

ते पुढे बोलताना म्हणाले की, लोककवी वामनदादा कर्डक या परंपरेतील कोहिनूर आहे. दादांनी त्यांच्या हयातीत हजारो गाणे लिहिली, त्यातून सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया निर्माण झाली. दादांच्या गाण्यांनी चळवळीला बळ दिले हे अत्यंत महत्त्वाचे आणि मोलाचे काम महाकवी वामनदादा कर्डक यांनी त्यांच्या आयुष्यात केल. महाकवी वामनदादा कर्डक यांच्या एकशे तीनव्या जयंती निमित्ताने दिनांक २९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता दुसरबीड येथील गीतांजली लॉन्स येथे कार्यक्रमाचे आयोजन केले होते.




या कार्यक्रमाचे उद्घाटन महाकवी वामनदादा कर्डक यांच्या सहवासात राहिलेले महाराष्ट्र शासनाचा शाहिरी पुरस्कार विजेते शाहीर डी आर इंगळे यांचे हस्ते पार पडले,या कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी लोकजागर परिवाराचे सर्वेसर्वा प्रवीण गीते हे होते.प्रमुख अतिथी म्हणून प्रा संजयजी खडसे उपविभागीय अधिकारी सी राजा हे होते.या सह अनेक मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते.

या प्रसंगी लोककवी,वामनदादा कर्डक यांना १०३ वी जयंतीच्या निमित्ताने अनेक शाहिरांनी आपल्या गीतांच्या माध्यमातून दादांना आदरांजली वाहिली. आज सकाळपासूनच प्रचंड पाऊस असताना सुद्धा सतत पाच तास चाललेल्या या कार्यक्रमातुन रसिक,श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. जोरात बरसत असून सुद्धा अनेक कलाकारांनी वामनदादा च्या जयंती साठी पावसाची परवा न करता मोठ्या संख्येने उपस्थिती दाखवली. विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी मुंबईवरून आलेल्या गायिका मंदाताई वाघमारे यांनी आपल्या गीताच्या माध्यमातून वामनदादा काय होते हे समजून सांगण्याचा प्रयत्न केला. आयोजकाने वाघमारे ताईचे आभार मानले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बुलडाणा चौफेरेचे मुख्य संपादक गंगाराम उबाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त लोकशाहीर भीमरावजी थोरवे यांनी केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# तुपकरांच्या नेतृत्वात मलकापुरात शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा

## पिकविमा, कर्जमुक्तीच्या प्रश्नावर रविकांत तुपकर आक्रमक.. क्रांतिकारी आंदोलनाचा वणवा पेटवणार

**दैनिक आपला विदर्भ**





**मलकापूर/प्रतिनिधी:** शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आणि विविध मागण्यांसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली आज, शनिवारी मलकापूर येथे उपविभागीय अधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या संख्येने शेतकरी बांधव सहभागी झाले होते. थकलेला पिक विमा १००% मिळावा, शेतकऱ्यांना कर्जमुक्ती मिळावी, विवरा गावातील सोलर कंपनीने अतिक्रमण केलेला रस्ता मोकळा व्हावा, ज्वारीची खरेदी सुरू व्हावी, तसेच कापूस आणि सोयाबीनच्या आयात-निर्यात धोरणात बदल व्हावा,शेतमजूरांना विमा सुरक्षा मिळावी, जंगली जनावरांचा त्रास अशा विविध मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला.

सोयाबीन कापूस उत्पादकांसाठी लढाई उभी करणार

मोर्चाला संबोधित करताना शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सरकार आणि प्रशासनावर जोरदार टीका केली. ते म्हणाले, ''शेतकऱ्यांची ही लढाई दुसऱ्या स्वातंत्र्याची लढाई आहे. सरकारने कापसावरील आयात शुल्क हटवल्याने कापसाचे भाव कमी होण्याची भीती आहे. त्यामुळे सरकारने तातडीने आयात-निर्यात धोरणात बदल करावा. तसेच, सोयाबीनची सोयापेंड निर्यात करावी, जेणेकरून शेतकऱ्यांना सोयाबीनला रास्त भाव मिळण्यास मदत होईल.''

तुपकर यांनी पुढे सांगितले की, आज मलकापूरात सुरू झालेला हा मोर्चा एका वणव्यासारखा संपूर्ण महाराष्ट्रात पसरेल. ''निवडणुकीपूर्वी सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे दिलेले आश्वासन पूर्ण करावे. पिक विमा कंपन्यांनी अधिक विलंब न करता शेतकऱ्यांना थकित पिक विमा त्वरित द्यावा. सध्या आम्ही शांततेच्या मार्गाने आंदोलन करत आहोत, परंतु सरकारने दिरंगाई केली तर आम्हाला आक्रमक आंदोलनही करता येईल,'' असा इशारा त्यांनी दिला.

शेतकऱ्यांच्या मागण्या

- थकित पिक विमा त्वरित मिळावा: पिक विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना थकित रक्कम तातडीने द्यावी.

- शेतकरी कर्जमुक्ती: सरकारने निवडणुकीपूर्वी दिलेले कर्जमाफीचे आश्वासन पूर्ण करावे.

- सोलर कंपनीचे अतिक्रमण हटवावे: विवरा गावातील सोलर कंपनीने अतिक्रमण केलेला रस्ता मोकळा करावा.

- ज्वारी खरेदी सुरू व्हावी: शेतकऱ्यांची ज्वारी ची खरेदी त्वरित सुरू करावी

- आयात-निर्यात धोरणात बदल: कापसावरील आयात शुल्क पुन्हा लागू करावे आणि सोयाबीन डीओसी, सोयापेंड निर्यातीला परवानगी द्यावी.

मोर्चात मोठ्या संख्येने शेतकऱ्यांचा सहभाग

या मोर्चात मलकापूर तालुक्यासह आसपासच्या परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शेतकऱ्यांनी जनता चौक ते तहसील कार्यालय पायी मोर्चा करत आपला रोष व्यक्त केला. शांततेत काढण्यात आलेल्या या मोर्चाने प्रशासनाला शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली आहे.

मोठा पोलीस बंदोबस्त अन प्रशासनाला इशारा

रविकांत तुपकर यांनी प्रशासनाला उद्देशून सांगितले की, ''शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत. आम्ही शांततेच्या मार्गाने लढत आहोत, पण गरज पडल्यास आम्ही आंदोलन तीव्र करू.''

मोर्चाच्या आयोजनाची जबाबदारी

अमोल राऊत आणि सचिन शिंगोटे यांनी पारपाडली यावेळी सचिन पांडुळे,दामोदर शर्मा,गजानन भोपळे,विश्वास पाटील प्रविण पाटील,रंजीत डोसे, हर्षल मोरे, गोपाल रायपुरे, भागवत अढाव, विलास इंगळे,सुरज कोलते, गजानन नाईकवाडे,यांची प्रामुख्याने उपस्थिती होती

हा मोर्चा शेतकऱ्यांच्या एकजुटीचे आणि त्यांच्या हक्कांसाठीच्या लढ्याचे प्रतीक ठरला असून, येत्या काळात या आंदोलनाचा वणवा राज्यभर पसरण्याची शक्यता तुपकर यांनी व्यक्त केली आहे.

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी घेतले लालबागच्या गणरायाचे दर्शन

**मुंबई/प्रतिनिधी:** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मुंबईतील मानाच्या गणपतींपैकी एक असलेल्या लालबागच्या गणरायाचे सहकुटुंब दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या हस्ते गणरायाची पूजा करण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार, पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार रवींद्र चव्हाण, अमित साटम, स्थानिक लोकप्रतिनिधी आदी यावेळी अमित शाह यांच्या समवेत उपस्थित होते.



## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी घेतले वर्षा निवासस्थानी गणरायाचे दर्शन

**मुंबई/प्रतिनिधी:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सपत्निक भेट देवून श्री गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी श्री. शाह यांचे गणेश मूर्ती शाल, श्रीफळ तसेच पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार, पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार रवींद्र चव्हाण, अमित साटम, मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या मातोश्री सरितताई फडणवीस, पत्नी अमृता फडणवीस, कन्या दिविजा फडणवीस तसेच इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# व्यवसायातून उन्नती साधूया.. जीवनाचा उत्कर्ष घडवूया

राज्यातील युवक-युवतींमध्ये असलेल्या प्रचंड क्षमतेला दिशा देण्यासाठी व स्वप्नांना वास्तवात आणण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. समाजातील मागास घटक, बेरोजगार युवक-युवती यांना व्यवसायासाठी प्रोत्साहन देऊन विविध योजनांच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात येत असून रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात येत आहेत.

युवकांच्या हाताला रोजगार दिला तर ते इतरांसाठीही रोजगार निर्माण करतील. याच विचाराने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ कार्यरत आहे. बेरोजगारी कमी करण्यासाठी व उद्योग-व्यवसायात तरुणांना संधी देण्यासाठी या महामंडळामार्फत विविध योजना राबविल्या जातात.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ हे महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील एक महत्त्वाचे महामंडळ आहे. हे महामंडळ प्रामुख्याने मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील तरुणांना आर्थिक सहाय्य पुरवून त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. या महामंडळाची स्थापना २७ नोव्हेंबर १९९८ रोजी मराठा समाजातील बेरोजगारी कमी करण्यासाठी आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी करण्यात आली आहे. या महामंडळामार्फत अल्प व्याजदर कर्ज सुविधा, अनुदानावर आधारित आर्थिक योजना, प्रशिक्षण कार्यक्रम, व्यवसाय मार्गदर्शन आणि तरुणांसाठी व्यवसाय योजना अशा आर्थिक विकासाच्या योजना राबवल्या जातात. या योजनांचा मुख्य उद्देश मराठा समाजातील तरुणांना व्यवसायासाठी लागणारी भांडवली मदत पुरवून त्यांना स्वावलंबी बनवणे. यामुळे अनेक तरुणांनी स्वतःचे उद्योग सुरू केले आहेत. या महामंडळाच्या मदतीमुळे ग्रामीण भागातसुद्धा उद्योजकतेचा विकास होताना दिसत आहे.

### अर्थसंकल्पात ७५० कोटी रुपयांची तरतूद

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांसाठी राज्य शासनाने अर्थसंकल्पात ७५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यापैकी पहिल्या टप्प्यात ३०० कोटी रुपयांचा निधी वितरित केला आहे. नियोजन विभागाने याबाबतचा शासन निर्णय १५ जुलै २०२५ रोजी निर्गमित केला आहे.

या महामंडळा मार्फत वैयक्तिक कर्ज आणि गट कर्ज व्याज परतावा या योजना राबवल्या जातात.

### वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (IR-I)

या योजनेअंतर्गत राज्यातील कोणत्याही बँकेमार्फत १५ लाख रुपयाच्या मर्यादेत कोणत्याही व्यवसाय / उद्योगाकरीता लाभार्थ्यांनी कर्ज घेतल्यास, त्या कर्जावरील व्याज परतावा जास्तीत-जास्त ७ वर्षाकरीता, १२ टक्केंच्या कर्ज दर मर्यादेत अथवा ४.५ लाख रुपये रक्कमेच्या मर्यादेत देण्यात येतो. २ फेब्रुवारी २०१८ ते २९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत एकूण निर्माण झालेले पात्रता प्रमाणपत्र () १,८९,३१८ तर एकूण बँक कर्ज मंजुरी लाभार्थी संख्या १,५३,७२६ असून बँकांनी वितरित केलेली कर्ज मंजूर रक्कम १३,१६९.९९ कोटी आहे. व्याज परतावा सुरु झालेली लाभार्थी संख्या (Claim) १,७५,८३६ असून व्याज परतावा झालेली रक्कम १,३६१.५८ कोटी रुपये आहे.

### गट कर्ज व्याज परतावा योजना (IR-II)

या योजनेअंतर्गत किमान दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तींच्या गटाने एकत्र येऊन, दोन व्यक्तींसाठी कमाल २५ लाख रुपयाच्या मर्यादेवर, तीन व्यक्तींसाठी ३५ लाखाच्या मर्यादेवर, चार व्यक्तींसाठी ४५ लाखाच्या मर्यादेवर व पाच व पाच पेक्षा अधिक व्यक्ती असल्यास ५० लाखापर्यंतच्या व्यवसाय / उद्योग कर्जावर ५ वर्षापर्यंत अथवा कर्ज कालावधी यापैकी जे कमी असेल ते, जास्तीत जास्त १२ टक्के व्याज किंवा १५ लाखाच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हफ्ते भरल्यास, हफ्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम गटाच्या बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. या योजनेमध्ये शेतकरी उत्पादक कंपन्या () गटांनी त्यांच्या शेतीपूरक व्यवसायाकरीता बँकेमार्फत घेतलेल्या कर्जावरील देखील व्याज परतावा नियमानुसार महामंडळ करेल. २ फेब्रुवारी २०१८ ते २९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत एकूण निर्माण झालेले पात्रता प्रमाणपत्र १०१४ असून एकूण बँक कर्ज मंजुरी लाभार्थी गट संख्या ९६९ आहे. एकूण बँकेने वितरित केलेली कर्ज मंजूर रक्कम ३६१.८७ कोटी आहे. व्याज परतावा सुरु झालेली लाभार्थी संख्या () ५८९ आहे. व्याज परतावा झालेली रक्कम ३४.०३ कोटी आहे.

### गट प्रकल्प कर्ज योजना (GL-I) :

FPC (Farmer Producer Company) गटांना १० लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज उद्योगासाठी देण्यात येते व ७ वर्षे वसुली करण्यात येते. सद्यस्थितीत गट प्रकल्प कर्ज योजना ही गट कर्ज व्याज परतावा योजना मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. महामंडळामार्फत २९ ऑगस्ट २०२५ पर्यंत लाभार्थ्यांना व लाभार्थी गटांना एकूण १,३९८.९६ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

### महामंडळाच्या योजनांकरिता अटी व शर्ती

उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य आहे. अर्जदाराचे वय १८ ते ६० वर्षांच्या दरम्यान असावे. लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ८ लाखाच्या आत असावे. (जे ८ लाखाच्या मर्यादेत असल्याचे तहसिलदाराचे प्रमाणपत्र) किंवा वैयक्तीक (पती व पत्नीचे) लाभार्थ्यांने महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रात स्थायिक / कार्यरत असलेल्या बँकेकडून कर्ज घेणे अनिवार्य असेल. दिव्यांग व्यक्तीला योजनेअंतर्गत लाभ घ्यावयाचा असल्यास तो मानसिक दृष्ट्या सक्षम असावा. गट कर्ज व्याज परतावा योजना अंतर्गत भागीदारी संस्था, सहकारी संस्था, बचत गट, एल.एल. पी. कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट / संस्था लाभास पात्र असतील. महामंडळाच्या योजनांतर्गत फक्त व्यवसाय / उद्योगाकरीता घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा करण्यात येईल व या योजनांची अंमलबजावणी तंतोतंत शासन निर्णय क्र. अपाम २०१७/प्र.क्र.१८९/रोस्वरो-१, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ नुसार करण्यात येईल.

### योजनांचा लाभ घेण्यासाठी कार्यपध्दती

महामंडळाकडून (Letter of Intent (LOI)) काढण्यासाठी खालील कागदपत्रे लागतात. ही कागदपत्रे ऑनलाइन अर्ज करताना अपलोड करावी लागतात.

**पात्रता प्रमाणपत्र (LOI) करीता महत्वाची कागदपत्रे**

१. आधार कार्ड (अपडेटेड मोबाइल क्रमांक व स्वतःचा ई-मेल आयडीसह) २. रहिवासी पुरावा (रहिवासी दाखला / लाईट बिल / रेशनकार्ड / गॅस बिल / बँक बुक) ३. उत्पन्नाचा पुरावा(उत्पन्नाचा दाखला / आयकर रिटर्न जर लग्न झाले असल्यास, नवरा-बायकोचे व लग्न न झालेल्या सदस्यांचे स्वतःचे आयकर रिटर्न आवश्यक) ४. जातीचा पुरावा, शाळा सोडल्याचा दाखला/ उतारा नंबर १ किंवा जातीचा दाखला.

५. लग्न झालेल्या महिलांसाठी / / गॅझेट आवश्यक. ६. एक पानी प्रकल्प अहवाल (वेब प्रणलीवर उपलब्ध आहे) ७. स्वतः घोषणापत्र (वेब प्रणलीवर उपलब्ध आहे) (जर आधार कार्ड व शाळा सोडल्याचा दाखला यामधील जन्म तारखे मध्ये तफावत असल्यास) ही कागदपत्रे अपलोड करताना त्यांची स्कॅन केलेली प्रत स्पष्ट आणि वाचण्यायोग्य असावी. अर्ज करताना तुम्हाला https://udyog.mahaswayam.gov.in या वेबसाइटवर नोंदणी करून अर्ज भरावा लागतो. यानंतर तुम्हाला 'LOI' मिळते, जे बँकेत कर्ज मंजुरीसाठी सादर करावे लागते.

तुम्ही कोणत्या योजनेसाठी अर्ज करत आहात (वैयक्तिक किंवा गट) त्यानुसार काही कागदपत्रे बदलू शकतात. अधिकृत आणि अचूक माहितीसाठी, महामंडळाच्या वेबसाइटला भेट देणे किंवा जवळच्या जिल्हा कार्यालयात संपर्क साधावा.

### अर्ज प्रक्रिया

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला https://udyog.mahaswayam.gov.in या अधिकृत वेबसाइटवर नोंदणी करून अर्ज करावा. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराला ऑनलाइन अर्ज करून घेणे आवश्यक आहे. पात्रता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर समवेत लाभार्थ्यांने त्याला करावयाचा असलेल्या व्यवसायाचा / उद्योगाचा प्रकल्प अहवाल (आवश्यक ते सर्व कागदपत्र) घेऊन त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही बँकेमध्ये कर्ज प्रकरण दाखल करावे. कर्ज मंजूरीची पुर्ण प्रक्रीया बँक त्यांच्या नियमानुसार करीत असते, यामध्ये महामंडळ कोणत्याही स्वरुपाचा हस्तक्षेप करीत नाही. कर्ज प्रकरण दाखल केल्यानंतर पोचपावती बँकेकडून घ्यावी. बँकेने कर्ज मंजुर केल्यानंतर कर्ज मंजूरीबाबतची आवश्यक सर्व माहिती संबंधिताने वेब प्रणालीवर करावी. (उदा. ज्या खात्यामध्ये व्याज परतावा हवा आहे त्याचा तपशील, बँक कर्ज मंजुरी पत्र, बँकेमार्फत वितरीत करण्यात आलेल्या कर्जाचा पुरावा (बँक स्टेटमेंट), बँक वेळापत्रक (त्यावर वसुलीचा दिनांक असणे अनिवार्य), प्रकल्प अहवाल, हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा (बँक स्टेटमेंट).

त्यानंतर बँकेमध्ये पुर्ण हफ्ता भरल्यानंतरच महामंडळाच्या वेब प्रणालीवर ऑनलाईन क्लेम दाखल करावा. लाभार्थ्यांने विहित कालमर्यादेत भरला असेल तरच त्याला व्याज परताव्याचा लाभ देता येईल. यामध्ये हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा म्हणून बँक स्टेटमेंट अपलोड करणे अनिवार्य असेल. लाभार्थ्याने दाखल केलेल्या क्लेमची पडताळणी महामंडळामार्फत करण्यात येऊन, लाभार्थ्यांस अनुज्ञेय असलेली व्याज परताव्याची रक्कम संबंधिताच्या बँक खात्यात ऑनलाईन स्वरुपात वितरीत करण्यात येईल. या योजनांच्या लाभाकरीता कोणत्याही सहकार्याची आवश्यकता असल्यास महामंडळाच्या जिल्हा समन्वयकांना संपर्क साधावा. जिल्हा समन्वयकांचा संपर्क वेब प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या योजनांच्या सहाय्याकरिता महामंडळाचे मुंबई मुख्यालय व जिल्हा निहाय जिल्हा समन्वयकांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे कोणत्याही खाजगी व्यक्ती / संस्थेच्या आमीषाला बळी पडू नये.

या महामंडळाच्यावतीने तरुणांना व उद्योजकांना स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी केवळ भांडवली मदतच नव्हे तर सर्वांगीण मार्गदर्शन आणि आवश्यक प्रशिक्षणाचीही सुविधा उपलब्ध करून दिली जाते. महामंडळाच्या माध्यमातून गेल्या काही वर्षांत राज्यातील हजारो तरुणांनी व्यवसाय, सेवा क्षेत्र, उत्पादन उद्योग, लघु व मध्यम उद्योग, तसेच शेतीपूरक व्यवसाय यांसारख्या विविध क्षेत्रांत स्वतःचा ठसा उमटवला आहे. या तरुणांनी उभारलेल्या उद्योगधंद्यांमुळे केवळ स्वतःचा रोजगार निर्माण झाला नाही, तर इतर अनेकांना देखील रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. राज्य शासनाच्या धोरणांतर्गत महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीच्या या योजना ही फक्त लाभार्थ्यांच्या हितासाठी नसून महाराष्ट्राच्या भविष्याच्या पायाभरणीसाठी टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. ग्रामीण व शहरी भागातील युवकांना संधी देऊन त्यांना स्वावलंबनाच्या मार्गावर उभे करण्याचे कार्य या माध्यमातून होत आहे. या योजना ही केवळ आर्थिक मदत पुरवणारी नसून, आत्मनिर्भर महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि मराठा समाजातील घटकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी एक प्रभावी साधन ठरल्या आहेत.

**शैलजा पाटील ,**
**विभागीय संपर्क अधिकारी.**

# आंदोलनाकडे इंग्रजासारखा पाहण्याचा दृष्टिकोन न ठेवता लोकशाहीच्या मार्गाने तोडगा काढण्याचा प्रयत्न करावा - बच्चू कडू

## आम्ही आता शेतकरी हक्क परिषद काढणार असून २८ ऑक्टोबर रोजी मुंबईत होणाऱ्या आंदोलनाची तयारी सुरू आहे - बच्चू कडू

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी:** शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या विविध संघटनांच्या वतीने आज शेतकरी हक्क परिषद आयोजित करण्यात येणार आहे. या परिषदेत प्रत्येक जिल्ह्यात चार ते पाच सभा घेण्यात येणार असून, याच माध्यमातून २८ ऑक्टोबर रोजी मुंबईत होणाऱ्या आंदोलनाची तयारी करण्यात येईल. या संदर्भात माजी मंत्री आणि शेतकरी नेते बच्चू कडू यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

**शेतकऱ्यांचे हित आणि कापसावरील निर्णय**

बच्चू कडू यांनी कापसावरील ११% आयात कर हटवण्याच्या निर्णयावर भाष्य केले. ''कापसावरील आयात कर हटवण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला आहे. हा निर्णय ट्रम्प यांच्या मागणीवर आधारित आहे. या निर्णयामुळे भारतात कापूस आयात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी, कापूस आणि सोयाबीनच्या किमतींमध्ये मोठा फरक पडणार आहे. शेतकऱ्यांना किमतींचा फायदा होण्याची शक्यता कमी आहे, आणि हमीभाव मिळण्याची पण स्थिती नाही. त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांसाठी हमीभाव घोषित केला पाहिजे,'' असे ते म्हणाले.

**आंदोलनाची तयारी आणि सरकारची भूमिका**

२८ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या आंदोलनाच्या संदर्भात, कडू यांनी सांगितले की, ''सरकारने आंदोलकांना शत्रू मानू नये.



आंदोलक हे लोकशाहीचे एक महत्त्वपूर्ण शस्त्र आहेत. सरकारने इंग्रजांच्या दृष्टिकोनातून आंदोलनाकडे पाहणे बंद करावे आणि त्यावर सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा. सरकारने आंदोलकांच्या मागण्यांकडे लक्ष दिले पाहिजे. राजकारण करत असलेल्या सरकारच्या धोरणांमुळे समाजातील एकोपा तोडण्याचे काम सुरू आहे. हे चुकीचे आहे.''

**मनोज जरांगे यांच्या आंदोलनास समर्थन**

कडू यांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनाबाबतही भूमिका स्पष्ट केली. ''जर सरकार राजकारण करत असेल, तर ते समाजाच्या एकोप्याला हानी पोहचवणारे आहे. भाजप आपल्या राजकीय हितासाठी समाजातील एकोपा तोडण्याचं काम करत आहे. मनोज जरांगे यांनी उचललेलं आंदोलन हे एक प्रगल्भ मुद्दा आहे, आणि ते सरकारच्या चुकीच्या धोरणांविरोधात आहे,'' अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

**आंदोलनांचे महत्त्व आणि सरकारचा दृष्टिकोन**

शेतकरी आणि समाजातील विविध घटकांच्या आंदोलनांना सरकारने शत्रू मानण्यापेक्षा त्यांच्याशी संवाद साधून उपाय शोधावा, असे कडू यांनी सांगितले. ''लोकशाहीच्या खऱ्या अर्थाने आंदोलने होणे आवश्यक आहे, आणि त्यावर योग्य पद्धतीने विचार करून सरकारने योग्य निर्णय घ्यावेत,'' असे ते म्हणाले.

## छोट्या बजेटमध्ये मोठा धमाका, मोहनलाल यांचा चालू वर्षातील मोठी ओपनिंग देणारा सिनेमा, कमाई किती?

**मुंबई/प्रतिनिधी:** मल्याळम चित्रपटसृष्टीतील सुपरस्टार मोहनलाल यांचा कौटुंबिक ड्रामा चित्रपट 'हृदयपूर्वम' नुकताच २८ ऑगस्टला प्रदर्शित झाला. 'हृदयपूर्वम'चे दिग्दर्शन सथ्यान अंतिक्काड यांनी केले असून हा एक कौटुंबिक ड्रामा आहे, ज्याला प्रेक्षकांची चांगली पसंती मिळत आहे. चित्रपटाने पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली आहे. 'हृदयपूर्वम'चे ओपनिंग डे कलेक्शन अपेक्षेपेक्षा जास्त झाले असून त्याने 'लोका चॅप्टर १' या चित्रपटाला कमाईत मागे टाकले आहे. मोहनलाल यांचा २०२५ या वर्षातील हा तिसरा चित्रपट आहे. पाहूया, 'हृदयपूर्वम'ने पहिल्या दिवशी किती कमाई केली. 'हृदयपूर्वम'ची थेट टक्कर 'लोका चॅप्टर १' या सुपरह्युमन फिल्मशी झाली होती. चित्रपटात मोहनलाल मुख्य भूमिकेत असून त्याचा ओपनिंगला मोठा फायदा झाला. चित्रपटसृष्टी ट्रॅकर सॅकनिल्कच्या अहवालानुसार, 'हृदयपूरवम'ने बॉक्स ऑफिसवर पहिल्याच दिवशी ३.३५ कोटी रुपये कमावले. मात्र मोहनलालचा याच वर्षी आलेल्या चित्रपट 'थंडरम'च्या तुलनेत हे कलेक्शन कमी आहे. थंडरमने एप्रिल महिन्यात प्रदर्शित होताच ५.२५ कोटी रुपयेची ओपनिंग घेतली होती. तर 'लोका चॅप्टर १' ने पहिल्या दिवशी २.६२ कोटी रुपये कमावले होते.

# बुलढाण्यात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा; राष्ट्रीय, आंतराष्ट्रीय खेळाडूंचे सत्कार





**बुलढाणा/प्रतिनिधी:** हॉकीचे जादूगार स्व. मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त केंद्र व राज्य शासनामार्फत साजरा होणारा ''राष्ट्रीय क्रीडा दिन'' शारदा ज्ञानपीठ स्कुल, बुलढाणा येथे उत्साहात पार पडला. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, विविध क्रीडा संघटना व शारदा ज्ञानपीठ स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात जिल्ह्यातील १६९ आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.

यावेळी आमदार संजय गायकवाड, उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, पोलिस निरीक्षक विकास तिडके, समाधान जावकार, नितीन अपार, डॉ. प्रमोद देशपांडे, मृत्युञ्जय गायकवाड, श्री शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी चंद्रकांत इलग व शारदा ज्ञानपीठ प्राचार्या उल्का अंतरकर यांची उपस्थिती होते.

दीपप्रज्वलनानंतर स्व. मेजर ध्यानचंद व स्व. खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस. महानकर यांनी प्रास्ताविकातून राष्ट्रीय क्रीडा दिनाचे महत्व स्पष्ट करत विविध क्रीडा उपक्रमांची माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात आ. संजय गायकवाड यांनी खेळाडूंनी कठोर परिश्रम व सातत्यपूर्ण सराव करून अधिकाधिक आंतराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर यश संपादन करावे, असे सांगून शुभेच्छा दिल्या. तसेच शारीरिक व्यायाम व खेळाचे जीवनातील महत्व अधोरेखित केले.

कार्यक्रमात सन २०२४-२५ मध्ये प्राविण्य मिळवलेल्या १३ आंतरराष्ट्रीय व १५७ राष्ट्रीय खेळाडूंना पुष्पगुच्छ व मेडल्स प्रदान करून गौरविण्यात आले. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त २९ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२५ दरम्यान विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यात जित कुने दो, वुशू, तलवारबाजी, शिवकालीन मर्दानी खेळ, आर्चरी व ज्युदो अशा जिल्हास्तरीय स्पर्धांचा समावेश असून सुमारे ५०० खेळाडू सहभागी होणार आहेत. विजेत्या खेळाडूंना प्रमाणपत्र व प्रोत्साहनपद देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज श्रीवास यांनी केले तर आभार प्रदर्शन रविंद्र धारपवार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी व मानद कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# बुलढाणा आरटीओ कार्यालयातील महिला अधिकाऱ्याचा एजंटला कानशिलात, गुन्हा दाखल

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा शहरातील आरटीओ कार्यालयातील महिला अधिकाऱ्याने एका एजंटला कानशिलात लगावल्याचा एक ताजा व्हिडिओ सोशल मिडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. यापूर्वी देखील या महिला अधिकाऱ्याचा एक व्हिडिओ समाज माध्यमांवर चर्चेत आला होता, ज्यात ती एका एजंटला शिवीगाळ करताना दिसली होती. या ताज्या घटनेमुळे आरटीओ कार्यालय पुन्हा एकदा वादाच्या भोवर्यात सापडले आहे.

घटनेचा मागोवा:

प्राप्त माहितीनुसार, बुलढाणा आरटीओ कार्यालयातील महिला





अधिकारी राजश्री चौधरी यांनी एक एजंट, इम्रान खान याला कानशिलात लगावत अश्लील शब्द वापरले. हा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल होताच, अनेकांनी या घटनेचा निषेध केला. व्हिडिओमध्ये राजश्री चौधरी एजंटला शिवीगाळ करत असल्याचे स्पष्ट दिसत आहे, ज्यामुळे या अधिकाऱ्याच्या वर्तनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

दोन्ही बाजूंनी गुन्हा दाखल:

घटनेनंतर, बुलढाणा शहर पोलिसांनी एजंट इम्रान खानच्या तक्रारीवरून महिला अधिकारी राजश्री चौधरी यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. यापुढे पोलिसांनी या प्रकरणाची सखोल तपासणी सुरू केली आहे. याउलट, राजश्री चौधरी यांनी देखील इम्रान खानविरुद्ध तक्रार केली असून, त्यांच्या तक्रारीवरून इम्रान खानवरही गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

राजश्री चौधरी यांच्या तक्रारीनुसार, इम्रान खानने त्यांना मानसिक त्रास दिला आणि कामाच्या ठिकाणी त्यांच्याशी गैरवर्तन केले. या बाबतीत पोलिसांनी दोन्ही पक्षांची चौकशी सुरू केली आहे, आणि संबंधित सर्व पुरावे गोळा करण्याची प्रक्रिया चालू आहे.

सामाजिक प्रतिक्रिया:

या घटनेनंतर अनेकांनी सोशल मिडियावर आपापले मत व्यक्त केले आहे. काही लोकांनी महिला अधिकारी राजश्री चौधरीच्या वर्तनाचा निषेध केला आहे, तर काहींनी एजंटच्या वर्तनावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. या प्रकरणाने आरटीओ कार्यालयातील कार्यपद्धतीवरही संशय व्यक्त केला आहे, आणि लोकांच्या मनात असंतोष वाढवला आहे.

निष्कर्ष:

बुलढाणा आरटीओ कार्यालयातील या ताज्या घटनेने पुन्हा एकदा सरकारी कर्मचाऱ्यांच्या वर्तनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. पोलिसांनी दोन्ही पक्षांवर गुन्हा दाखल केला आहे, आणि तपास सुरू आहे. या प्रकरणाच्या पुढील विकासावर सर्वांचे लक्ष आहे, आणि ते काय रूप घेतील, हे भविष्यकाळात स्पष्ट होईल.

## विविध वृत्त...

### जिजामाता गणेश मित्र मंडळाजवळ रस्त्यावरील खड्ड्यात साचले पाणी, गणेश भक्त त्रस्त, ग्रामपंचायत प्रशासन सुस्त



**डोणगाव/कार्यालय प्रतिनिधी:** डोणगाव जिजामाता गणेश मित्र मंडळाजवळील मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, त्यात साचलेल्या सांडपाण्यामुळे गणेशभक्तांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. ये-जा करणाऱ्या नागरिकांची चिखलामुळे गैरसोय होत आहे, तसेच वाहने घसरून अपघात होण्याचा धोका वाढला आहे. तर लहान लहान मुले त्या खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्यात खेळत असल्यामुळे आजार उद्भवत आहेत

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंडळाकडून सजावट, आरास आणि सार्वजनिक कार्यक्रमांची तयारी सुरू आहे. मात्र, रस्त्यावरील या पाण्यामुळे गणपती दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना अडथळा निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी यासंदर्भात ग्रामपंचायतीकडे वारंवार तक्रार केली असतानाही, अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

''प्रशासनाकडून वेळेवर लक्ष दिले गेले असते, तर अशा परिस्थितीला सामोरे जावे लागले नसते,'' अशी प्रतिक्रिया मंडळाचे अध्यक्ष सह सदस्यांनी दिली. स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासन आणि संबंधित संस्थांनी तात्काळ योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे

### गणपती बाप्पांची छायाचित्रे अपलोड करण्यासाठी शासनाच्या वतीने पोर्टलची निर्मिती, आपल्या बाप्पांचे फोटो अपलोड करण्याचे व दर्शन करण्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांचे आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी:** महाराष्ट्रातील गणेशोत्सवास राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आला आहे. या राज्योत्सवांतर्गत घरोघरीच्या बाप्पांचे व सार्वजनिक मंडळांच्या बाप्पांची छायाचित्रे अपलोड करणे, प्रसिद्ध मंडळे व मंदिरातील गणपतींचे थेट दर्शन मिळावे याकरिता पु ल देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यावतीने https://ganeshotsav.pldmka.co.in या पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे.

या पोर्टलवर आपण आपल्या घरच्या गणपती बाप्पांचे व सार्वजनिक मंडळातील बाप्पांचे छायाचित्र अपलोड करू शकता. तसेच, महाराष्ट्रातील प्रसिद्ध मंदिरे व सार्वजनिक मंडळातील बाप्पांचे थेट दर्शन घेण्याची सोय देखील या पोर्टलद्वारे करण्यात आली आहे. या संधीचा लाभ अधिकाधिक गणेशभक्तांनी घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

### मुंबई उपनगर जिल्ह्यात अद्यावत क्रीडा संकुल विकसित करणार - पालकमंत्री ॲड. आशिष शेलार

**मुंबई/प्रतिनिधी:** आजच्या युगात अभ्यासासोबत खेळाचे महत्त्व आहे. शासनाकडून आवश्यक ती सर्व मदत खेळाडूंना देण्यात येत आहे. याशिवाय मुंबई उपनगर जिल्ह्यात या वर्षांमध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाअंतर्गत एक अद्यावत क्रीडा संकुल विकसित करण्यात येत असून यामध्ये विविध प्रकारांच्या क्रीडा सुविधा उपलब्ध असतील असे मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक कल्याण विभागा अंतर्गत असणाऱ्या जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर द्वारा मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनाच्या निमित्त २९ ऑगस्ट हा राष्ट्रीय क्रीडा दिन कार्यक्रम उत्तर भारतीय संस्था हॉल, बांद्रा पूर्व येथे करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री ॲड. आशिष शेलार होते. यावेळी जिल्हाधिकारी सौरभ काटियार,एन स्वामी रंगास्वामी (समर ऑलिंपिक खेळाडू) आंतरराष्ट्रीय वेट लिफ्टिंग खेळाडू, श्री. विपुल घोष (द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित)उपस्थित होते.

पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विविध क्रीडा क्षेत्रामध्ये प्राविण्य प्राप्त खेळाडूंचे मुंबई उपनगर जिल्ह्याचा नावलौकिक वाढविल्याबद्दल विशेष आभार मानले.

या कार्यक्रमामध्ये मुंबई उपनगर जिल्ह्यातील विविध खेळातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू, छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी अशा ११ पुरुष आणि महिला खेळाडूंचा सन्मान करण्यात आला. तसेच पारंपरिक खेळाचा वारसा असलेल्या दहीहंडी खेळाच्या पथकांचे पार्ले स्पोर्ट्स या महिला गोविंदा पथक (सात थरांचा विश्व विक्रम) कोकण नगर गोविंदा पथक आणि जय जवान गोविंदा पथक (दहा थरांचा विश्व विक्रम ) यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी घेतले वांद्रे सार्वजनिक मंडळांच्या गणेश मूर्तीचे दर्शन

**मुंबई/प्रतिनिधी:** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी वांद्रे (पश्चिम) येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या गणेश मूर्तीचे सहकुटुंब दर्शन घेत पूजा केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार, पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार रवींद्र चव्हाण, अमित साटम, मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र राऊत, पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अंधेरी पूर्व येथील श्री मोगरेश्वर सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाच्या श्री गणेशाचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी घेतले दर्शन



**मुंबई/प्रतिनिधी:** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अंधेरी पूर्व येथील श्री मोगरेश्वर सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाने स्थापन केलेल्या गणेशाचे दर्शन घेतले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही श्री गणेशाचे दर्शन घेतले. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार, आमदार मुरजी पटेल व अन्य मान्यवर उपस्थित होते.